CNR NO.MHSO060005322024

**नियमित दिवाणी दावा क्र.३६/२०२४**

सौ. रुपाली चव्हाण

**वि.**

जिल्हाधिकारी, सोलापूर, वगैरे

## निशाणी क्रमांक ३५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२ ते ७ यांनी वादपत्र वादीस परत करण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम १० प्रमाणे दिलेला आहे. प्रतिवादींचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –

२. प्रतिवादींचे कथन आहे की, दाव्यामध्ये वादीने जिल्हाधिकारी तथा उपसंचालक पुनर्वसन यांना पक्षकार केलेले आहे, परंतु त्यांचेविरुध्द कोणतीही मागणी वादीने दाव्यात केलेली नाही. केवळ प्रतिवादी क्र.२ ते ७ विरुध्द निरंतर मनाई हुकूमाची मागणी वादीने केलेली आहे. त्यामुळे वादीस या न्यायालयात दावा दाखल करण्याचा अधिकार नाही. वादीचे दाव्यातील कथन व घडलेले कारण पाहता दावा या न्यायालयात चालणार नाही. करिता, वादपत्र वादीस परत करण्यात यावे.

३. वादीने म्हणणे मांडले की, वादमिळकतीच्या ७/१२ पत्रकी प्रतिवादी क्र.१ यांचे नांव आहे. प्रतिवादी क्र.१ च्या नांवावर काही क्षेत्र आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज कायदेशीर नाही. अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकले. दावा वादीने गट क्र.६७७/२/ब/२/ब मधील १हे. १६ आर. क्षेत्राबाबत कायमचा मनाई हुकूम मिळण्यासाठी प्रतिवादी क्र.२ ते ७ यांचेविरुध्द दाखल केलेला आहे. म्हणजेच दाव्यातील मनाई हुकूमाची विनंती केवळ प्रतिवादी क्र.२ ते ७ यांचेविरुध्द आहे. याच सबबीवर प्रतिवादी क्र.२ ते ७ यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. दाव्यातील वादमिळकतीचे वर्णन पाहता संपूर्ण गटाच्या चतुःसिमा दिल्याची बाब या क्षणी नाकारता येणार नाही. वादीचे कथन आहे की, वादमिळकतीलगत पश्चिम बाजुस प्रतिवादी क्र.१ चे ५ गुंठे क्षेत्र शिल्लक आहे. प्रतिवादी

क्र.२ ते ७ यांनी कैफियतीमध्ये दाव्यातील चतुःसिमा नाकारलेल्या आहेत. कैफियतीतील परिच्छेद क्र.१० मध्ये प्रतिवादींनी स्पष्ट नमुद केले की, प्रतिवादी क्र.१ चे क्षेत्र कोणत्या बाजुस आहे याचा उल्लेख वादीने दावा मिळकतीचे वर्णन व चतुःसिमा यामध्ये उल्लेखित केलेला नाही. निश्चित गट क्रमांक नमुद केलेला नाही. प्रतिवादी हे वादीचा वादमिळकतीवरील ताबा नाकारत असल्याचे कैफियतीवरुन दिसते. उपरोक्त बाब पाहता प्रतिवादी क्र.१ विरुध्द वादींनी मनाई हुकूम मागितलेला नसला तरी सदरील गटातील प्रतिवादी क्र.१ चे क्षेत्र पाहता व त्यासंदर्भात प्रतिवादी क्र.२ ते ७ यांनी घेतलेली हरकत पाहता प्रतिवादी क्र.१ हे दाव्यास योग्य पक्षकार असल्याचे प्रथमदर्शनी दिसते. प्रतिवादी क्र.१ हे आवश्यक नसले तरी योग्य पक्षकार (Proper party) असल्याने वादपत्र वादीस परत करण्याचे कारण नाही. करिता, अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. करिता, खालील आदेश.

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

स्वाक्षरीत/–

(नीलेश सु. बुद्रुक)

दि. २१.०६.२०२५.

सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

पंढरपूर.

# **CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same word to word as per the original.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Suresh M. Malkapalli |
| (b) | Court | : | Jt. Civil Judge (S.D.), Pandharpur. |
| (c) | Signed by P.O. On | : | 21.07.2025 |
| (d) | Uploaded on | : | 04.07.2025 |